

देहूरोड कॅन्टोन्मेंट बोर्डाचा पिंपरी महापालिकेत समावेश करा

e Paper

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in मंगळवार दिनांक 29/07/२०२५ METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन || पिंपरी चिंचवड व पुणे || पान 4 || अंक 167 || RNI - MAHMAR /2021/51259 || metrocity924@gmail.com


# स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या तयारीला लागा - मुख्यमंत्री

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**मुंबई : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत वर्ध्यात विदर्भ भाजपाच्या कार्यकर्त्यांची बैठक पार पडली. या बैठकीत देवेंद्र फडणवीस यांनी विदर्भ भाजपाच्या कार्यकर्त्यांचे विधानसभा निवडणुकीतील कामगिरीबाबत कौतुक केले. याचबरोबर त्यांनी येत्या काळात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची तयारी करण्याबाबत वक्तव्य केले आहे.**



स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीबाबत बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, “आता निवडणुकीच्या तोंडावर अनेक वाद उकरून काढले जातील. आपण केलेले काम लोकांना समजू नये, यासाठी विधानसभा निवडणुकीच्या दरम्यानही त्यांनी असे वाद उभे केले.

पण आपण आपले काम घेऊन जनतेमध्ये गेलो आणि लोकांनी आपल्याला मतदान केले. त्यामुळे आताही आपल्याला लोकांमध्ये जाऊन सरकारने केलेले काम आणि सरकारचे व्हिजन त्यांच्यासमोर मांडायचे आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीबाबत बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, “मला असे वाटते की, आपल्याला आता तयारीला लागायला पाहिजे.

या तिन्ही निवडणुका मागेपुढे येतील. जिल्हा परिषद किंवा नगरपालिका यापैकी एकाच्या निवडणुका आधी होतील आणि शेवटी महानगरपालिका निवडणुका होतील.

२०१७ मध्येही अशाच प्रकारे तीन टप्प्यांमध्ये निवडणुका झाल्या होत्या. त्याचप्रमाणे निवडणूक आयोग या निवडणुका घेईल.”

# बुद्धिबळपटू दिव्या देशमुखची ऐतिहासिक कामगिरी!

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

मुंबई : भारताची युवा बुद्धिबळपटू दिव्या देशमुखने इतिहास रचत फिडे विश्वचषक स्पर्धा जिंकली आहे. स्पर्धेच्या अंतिम फेरीत भारताच्याच ग्रँडमास्टर कोनेरू हम्पीचा पराभव करत दिव्या महिला विश्वचषक विजेती बनली आहे. यासोबतच तिने आपला ग्रँडमास्टर नॉर्म पूर्ण केला आहे आणि आता ती भारताची चौथी वुमन ग्रँडमास्टर झाली आहे. वयाच्या अवघ्या १९ वर्षी दिव्याने हे यश संपादन केले आहे.



दिव्याच्या या नेतृदीपक कामगिरीनंतर भारताचा जागतीक बुद्धिबळावर असलेले वर्चस्व पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. दरम्यान दिव्याच्या या यशानंतर राजकीय वर्तुळातून देखील तिचं भरभरून कौतुक केले जात आहे.मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, शरद पवार, मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी दिव्याचे अभिनंदन करत तिला शुभेच्छा दिल्या आहेत. दरम्यान, दिव्या देशमुखच्या या यशाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कौतुक केले आहे. नागपूर येथे पत्रकारांशी संवाद साधताना फडणवीस म्हणाले, “मला अतिशय आनंद आहे की महाराष्ट्राच्या आणि नागपूरच्या दिव्या देशमुखने बुद्धिबळाच्या जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत बाजी मारली आहे. ती पहिली किशोरवयीन खेळाडू आहे, जीने या स्तरावरील स्पर्धेत भाग घेऊन जेतेपद मिळवले आहे. यापूर्वीदेखील तिने भारतासाठी वेगवेगळ्या स्पर्धांमध्ये अनेक पदके जिंकली आहेत. तिने आतापर्यंत जवळपास ३५ पदके जिंकली असून, त्यापैकी २३ सुवर्ण पदके आहेत.”

**शरद पवार म्हणाले की, “जॉर्जियातील बटुमी येथे संपन्न झालेल्या FIDE Women’s World Cup 2025 स्पर्धेच्या अंतिम सामन्यात दोन भारतीय खेळाडू दिव्या देशमुख आणि कोनेरू हम्पी यांच्यात झालेला सामना बुद्धिबळातील भारताच्या उल्लेखनीय कामगिरीचं प्रतीक ठरला. विजेतेपद, ग्रँडमास्टर टायटल आणि भारतीय लेकींचा अंतिम सामना हा भारतीय बुद्धिबळाचा सुवर्णक्षणच म्हणावा लागेल!”**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी देखील दिव्याच्या विजयानंतर पोस्ट केली आहे.

“जॉर्जिया देशातील बटुमी शहरात खेळल्या गेलेल्या महिला बुद्धिबळ विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम फेरीत महाराष्ट्राच्या दिव्या देशमुखने भारताच्याच कोनेरू हम्पीचा पराभव करत विश्वचषकावर आपले नाव कोरले. असे विजेतेपद पटकवणारी ती पहिली भारतीय महिला बुद्धिबळपटू ठरली आहे.

# ओबीसी जनगणनेचे महत्त्व घरोघरी जाऊन सांगणार - समीर भुजबळ

## प्रदीप खंडू आहेर यांची पिंपरी चिंचवड शहर जिल्हा अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या अध्यक्षपदी नियुक्ती

>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देश पातळीवर ओबीसी समाजाची जनगणना करण्याचे जाहीर केले आहे. ही जनगणना झाल्यानंतर ओबीसी समाजातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक सवलतींसह आरक्षण, शासकीय, निमशासकीय नोकऱ्यांमध्ये आरक्षण, केंद्र व राज्य सरकारच्या ओबीसींसाठी असणाऱ्या विविध योजनांचा लाभ तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत आरक्षण मिळेल. हे लाभ समाजाच्या तळागाळापर्यंत पोहोचल्यानंतर ओबीसी समाज खऱ्या अर्थाने विकासाच्या प्रवाहात सामील होईल. ओबीसी जनगणनेचे आणि ओबीसी आरक्षणाचे फायदे सर्वसामान्य




नागरिकांना कळवेत यासाठी पुढील काळात अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे समता सैनिक घरोघरी जाऊन नागरिकांशी संपर्क करणार आहेत अशी माहिती माजी खासदार व समता परिषदेचे कार्याध्यक्ष समीर भुजबळ यांनी पिंपरी येथे आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत दिली.

यावेळी कार्याध्यक्ष बापूसाहेब भुजबळ, पिंपरी चिंचवडचे जेष्ठ नेते वसंत नाना लोंढे, पिंपरी चिंचवड शहर जिल्हा अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे अध्यक्ष प्रदीप खंडू आहेर, वंदना जाधव, आनंदा कुदळे, विजय लोखंडे, राजेंद्र करपे, मच्छिंद्र दरवडे, पि. के. महाजन कविता खराडे, विद्या भुजबळ, राजू भुजबळ, माणिक म्हेत्रे, हनुमंत माळी, महेश भागवत, प्रदीप जगताप, नकुल महाजन आदी उपस्थित होते. पिंपरी येथे समता परिषदेच्या प्रमुख कार्यकर्त्यांची सोमवारी (दि. २८) आढावा बैठक घेण्यात आली. यानंतर झालेल्या पत्रकार परिषदेत समीर भुजबळ बोलत होते. ते पुढे म्हणाले की, प्रदीप खंडू आहेर यांची पिंपरी चिंचवड शहर जिल्हा अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली. लवकरच नवीन शहर कार्यकारणी जाहीर करण्यात येईल.

माजी उपमुख्यमंत्री तथा अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष छगन भुजबळ यांच्या नेतृत्वाखाली समता परिषदेचे कार्य देशभर सुरू आहे. यामध्ये स्वर्गीय कृष्णकांत कुदळे, हरी नरके यांच्यासारख्या ज्येष्ठांचे देखील उल्लेखनीय योगदान आहे. पुण्यातील महात्मा जोतीराव फुले वाड्याचे राष्ट्रीय स्मारकात रूपांतर आणि लोकार्पण, नामांतराचा लढा, भिडे वाडा तसेच ओबीसींच्या हक्कांसाठी संघटन उभारत असताना देशभर लाखो नागरिकांच्या उपस्थितीत यशस्वी मेळावे घेतले आहेत. समता परिषद ही ओबीसींसह भटक्या विमुक्त जाती, जमाती, आदिवासी, मुस्लिम समाजातील ओबीसी तसेच मागासवर्गीय जाती व सर्वच उपेक्षित समाजासाठी काम करणारी संस्था आहे.

# अभिजन व बहुजन अशी महापुरुषांची वाटणी करणे पाप - डॉ.श्रीपाल सबनीस

>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

"लोकमान्य टिळक, गोपाळ गणेश आगरकर, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे आणि लोकशाहीर अण्णा भाऊ साठे हे स्वातंत्र्य आणि समतेचे पुजारी आहेत. महापुरुषांना जात धर्म देश यांच्या सीमा नसतात. ते सकल मानव जातीच्या कल्याणासाठी ते पूर्ण विश्वाला समर्पित असतात. म्हणून महापुरुषांना जातीच्या जाणव्यात बंदिस्त करणे हे सांस्कृतिक पाप आहे. महापुरुषांच्या सामर्थ्याची बेरीज करणे म्हणजेच विश्वाचे कल्याण करणे. त्यामुळे अनेक महापुरुषांचे थोर काम समाजापर्यंत पोहोचवणे काळाची गरज आहे." असे प्रतिपादन साहित्यिक डॉ. श्रीपाल सबनीस यांनी रविवारी मातंग साहित्य परिषद, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे संज्ञापन व वृत्तपत्र विभाग व अण्णा भाऊ साठे अध्यासन यांच्या वतीने आयोजित केलेल्या लोकमान्य टिळक, गोपाळ गणेश आगरकर, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे आणि लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या विचारांची



परिषदेत व्यक्त केले. डॉ.श्रीपाल सबनीस हे या परिषदेच्या अध्यक्षास्थानी होते.यावेळी ज्येष्ठ साहित्यिक व समाजसेवक पद्मश्री गिरीश प्रभुणे, विद्यापीठाचे प्र कुलगुरु डॉ. पराग काळकर,मातंग साहित्य परिषेदेचे अध्यक्ष डॉ.धनंजय भिसे , विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य रवींद्र शिंगणापूरकर, अधिष्ठाता डॉ. संजय तांबट, अण्णा धगाटे, संदीपान झोंबाडे,डॉ.श्यामा घोणसे,डॉ.सुनील भंडगे,डॉ.संतोष रोडे इत्यादी उपस्थित होते. तर पद्मश्री गिरीश प्रभुणे म्हणाले की ,लोकमान्य टिळकांनी ब्रिटिश राजवटी विरोधात सर्व भारतीयांना एकत्र करून स्वातंत्र्यलढा हा देश पातळीवरून नेला. स्वदेशी,स्वधर्म जागरूत करून राष्ट्रीय शिक्षणावर भर दिला. अग्रलेख लिहून समाजात जागृती केली परंतु या सर्व कामासाठी त्यांना तुरुंगात जावे लागले.सर्व महाम्हणुन आपल्याला महापुरुषांचे विचार आजच्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचे काम करायचे आहे." तर डॉ.पराग काळकर म्हणाले,"विद्यापीठाचे काम केवळ शिक्षण देण्याचे नसून,विद्यापीठाला त्यासह समाजिकसुधारनेचे ही काम करायचे आहे. प्रत्येक महापुरुषाने आपल्याला विधायक विचार दिला आहे आणि तो समाजापर्यंत पोहोचवायचा आहे".डॉ.संजय तांबट " आगरकरांचा विचार हा बुद्धी प्रामाण्यवादी आहे स्वातंत्र्य समता आणि आर्थिक प्रश्न यावर त्यांनी भर दिला. सर्व महापुरुषांचे विचार हे समाजापर्यंत पोहोचवणे अत्यंत गरजेचे आहे. तर "महर्षी वि.रा.शिंदे यांनी अस्पृश्यता निवारण्याचे कार्य हाती घेताना माणसं जोडली.त्यांनी डिप्रेस्ड क्लासेस मिशनरी स्थापना केली, विद्यार्थी शिक्षणाची चळवळ सुरु केली पुणे येथे अहिल्याश्रम नाना पेठ येथे विद्यालय सुरु केले.स्त्री शिक्षणाचा प्रसार केला त्यांना आधार देण्यासाठी व्यवसाय सुरू केले.वस्तीगृह काढले."असे मत आण्णा धगाटे यांनी मांडले.

सामाजिक कार्येकर्ते संदिपान झोंबाडे म्हणाले, की "श्रीपाद अमृत डांगे यांच्यामुळे ते लोकचळवळीत आले. लोकांचे प्रश्न, वेदना मांडून ते लोकशाहीर झाले. त्यांनी साहित्यात मांडलेले प्रश्न, वेदना, समस्या प्रत्येकाला आपल्या वाटल्या, त्यामुळे ते लोकांचे नेते आहेत. संयुक्त महाराष्ट्र चळवळीत आणि मराठीसाठी अण्णा भाऊ यांचे योगदान फार मोठे आहे. त्याला विसरून चालणार नाही."

डॉ. धनंजय भिसे यांनी कार्यक्रमाची संकल्पना व भूमिका मांडत असताना म्हणाले की," सर्व महापुरुषांच्या विचारात लोककल्याणाची भूमिका आहे.ह्यांचे विचार भारताला विश्वगुरू होण्यासाठी महत्त्वपुर्ण असणार आहेत." यावेळी साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे प्रभावशाली व्यक्तिमत्व पुरस्कारा हा डॉ. आगतराव अवघडे, उत्तम दंडीमे, युवराज कलवले,मुरलीधर झोंबाडे, एडवोकेट राणी सोनवणे,सुनिल लांडगे, कमलाकर वढेलकर, डॉ. यशवंत इंगळे, मानसी चिटणीस,डॉक्टर विजय रोडे राजाराम अस्वरे,सुरेश कंक, डॉ. अशोक मोरे,सागर काकडे, गणेश आवटे,ज्योती भिसे, संजय श्रीधर कांबळे,अरविंद भोसले, भारत टिळेकर, शंकर मानवतकर, गणेश भिसे,डॉ.किरण जाधव डॉ बुध्दाजी गाडेकर इत्यादींना प्रदान करण्यात आला.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

मंगळवार दिनांक 29/07/२०२५

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# शहरातील धर्मांतराच्या विरोधात आमदार उमा खापरे आक्रमक !

>>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



पिंपरी चिंचवड शहरात धर्मांतराच्या घटनेनंतर आमदार उमा खापरे या आक्रमक झाल्या आहे त्यांनी नुकतीच पोलीस आयुक्तालयात पोलीस आयुक्त यांची भेट घेतली व धर्मांतर करणाऱ्या भ्रष्ट लोकांवर कडक कारवाई करावी, अशी मागणी केली आहे.

नुकतेच पावसाळी अधिवेशन संपन्न झाले. या अधिवेशनातही धर्मांतरण विरोधी कायद्यावरून अनेक बाबी आमदार उमा खापरे यांनी निदर्शनास आणून दिल्या आहेत. तसेच धर्मांतर कायदा लवकरात लवकर करावा, अशी मागणी केली आहे.

पिंपरी चिंचवड शहरात नुकतेच धर्मांतर करण्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. यामध्ये सिंधी समाजाचे धर्मांतरण करण्याचा प्रयत्न केला जात असल्याचे पोलिसांच्या कारवाईत समजले, पोलिसांनी तात्काळ आरोपींना अटक केली. परंतु पिंपरी चिंचवड शहरात असे अनेक धर्मांतर करणारे भ्रष्ट लोक असतील, अशा लोकांची लवकरात लवकर चौकशी व्हावी. तसेच महाराष्ट्रातील ख्रिश्चन मिशनरी अशा पद्धतीने हिंदूंचा धर्मभ्रष्ट करण्याचाही प्रयत्न करत आहे. या लोकांना के कोणती संस्था उभी आहे, कोणत्या संस्थेचे अंतर्गत हे काम सुरू आहे. आपल्या देशात येऊन हे आपल्या लोकांचे धर्म परिवर्तन करतात याची माहिती पोलिसांनी घेणे आवश्यक आहे. अशा धर्मांतर करणाऱ्या लोकांची चौकशी करावी, जे तीन लोक धर्मांतर करण्याच्या घटनेत पोलिसांच्या ताब्यात आहेत. या लोकांची कसून चौकशी करावी, अशी मागणी आमदार उमा खापरे यांनी पोलीस आयुक्त यांच्याकडे केली आहे.

पोलीस आयुक्तालयाकडूनही आमदार उमा खापरे यांच्या मागणीला सकारात्मक असे उत्तर देत सदर धर्मांतर घटनेत अटक झालेल्या इसमांकडून हस्तगत करण्यात आलेल्या मोबाईल मधून आणखी काही माहिती समोर येईल, त्या आधारे या घटनेची चौकशी पुढे करता येईल, अशी माहिती पोलीस आयुक्त यांच्यामार्फत देण्यात आली.

# डेंग्यू-मलेरिया प्रतिबंधासाठी महापालिकेची धडक कारवाई

>>>> | दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत




डेंग्यू आणि मलेरियासारख्या आजारांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी पिंपरी चिंचवड महानगरपालिका आरोग्य विभागाच्या वतीने डास निर्मूलनाच्या उपाययोजना अधिक तीव्र करण्यात आल्या आहेत. महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह, अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे आणि उप आयुक्त सचिन पवार यांच्या मार्गदर्शनाखाली ही व्यापक मोहीम राबवण्यात येत आहे.

औषध फवारणीसह घरांची व कंटेनर तपासणी, भंगार दुकाने, बांधकामस्थळांची पाहणी, तसेच जनजागृती आणि दंडात्मक कारवाई यावर भर देण्यात येत आहे.

महानगरपालिकेच्या आठही क्षेत्रीय कार्यालयांमार्फत समन्वय साधून करण्यात आली कारवाई -

* घरांची तपासणी : एकूण ६ लाख १४ हजार ८५५ घरांची तपासणी करण्यात आली असून त्यापैकी १० हजार ६०७ घरांच्या परिसरात डास उत्पत्तीसाठी पोषक वातावरण असल्याचे आढळून आले

* कंटेनर तपासणी : ३२ लाख ५४ हजार ७३८ कंटेनरपैकी ११ हजार ५१२ कंटेनरमध्ये डास उत्पत्तीसाठी पोषक वातावरण असल्याचे आढळून आले.

* भंगार दुकाने – १३८५ भंगार दुकानांची तपासणी करण्यात आली. * बांधकाम स्थळे – १७३४ बांधकाम स्थळांची तपासणी करून त्यामध्ये अस्वच्छता व पाणी साचल्याचे निदर्शनास आले.

* नोटीस व दंड – ३ हजार ६१२ ठिकाणी नोटीस बजावण्यात आल्या असून ७३९ नागरिक व आस्थापनांवर थेट दंडात्मक कारवाई करत २६ लाख २७ हजार इतकी दंडाची रक्कम वसूल करण्यात आली.

**डासांपासून असा करा बचाव :**

* आठवड्यातून एक दिवस 'कोरडा दिवस' पाळा.

* साचलेले पाणी काढून टाका.

* फुलदाणी, टाकी, टायर, प्लास्टिक वस्तूंमध्ये पाणी साचू देऊ नका.

**डेंग्यू प्रतिबंधासाठी विविध जनजागृती उपक्रम:**

नियमित औषध फवारणी

घरोघरी माहितीपत्रकांचे वितरण

शाळांमध्ये विद्यार्थ्यांसाठी जनजागृती प्रशिक्षण

प्रभागस्तरावर विशेष जनजागृती कार्यक्रम

सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता मोहिमा

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत
मंगळवार दिनांक 29/07/२०२5
पिंपरी चिंचवड | पुणे
e Paper

# देहूरोड कॅन्टोन्मेंट बोर्डाचा पिंपरी महापालिकेत समावेश करा

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी - पुणे आणि खडकी कॅन्टोन्मेंट बोर्डाचा पुणे महापालिकेत समावेश केल्याप्रमाणे देहूरोड कॅन्टोन्मेंट बोर्डाचा पिंपरी-चिंचवड महापालिकेत समावेश करण्याची मागणी मावळचे शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्याकडे केली. त्यावर याबाबत राज्य शासनाने प्रस्ताव पाठवावा. हा प्रस्ताव आल्यास देहूरोडचा महापालिकेत समावेश करण्याची ग्वाही संरक्षण मंत्री सिंह यांनी दिल्याचे बारणे यांनी सांगितले.



## खासदार श्रीरंग बारणे यांचे संरक्षण मंत्र्यांना साकडे

खासदार श्रीरंग बारणे यांनी दिल्लीत संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांची भेट घेतली. देहूरोड कॅन्टोन्मेंट बोर्ड परिसरातील नागरिकांना मुलभूत सुविधा पुरविण्यात कमी पडत आहे. त्यामुळे देहूरोडचा पिंपरी महापालिकेत समावेश करण्याची विनंती केली. खासदार नरेश म्हस्के यावेळी सोबत होते. खासदार बारणे यांनी म्हटले आहे की, मावळ लोकसभा मतदारसंघात देहूरोड कॅन्टोन्मेंट बोर्डाचा समावेश आहे. देहूरोड छावणी ऐतिहासिक आहे. सैन्य, नागरिकांसाठी काम करित आहे. गेल्या काही वर्षांपासून या भागातील नागरिकरणात वाढ झाली आहे. लोकसंख्या वाढत असून नागरी सुविधांची मागणी वाढली आहे. सद्यस्थितीत देहूरोड कॅन्टोन्मेंट बोर्डाला या सुविधा पुरेशा प्रमाणात देणे अशक्य आहे. त्यामुळे देहूरोडचे पिंपरी महापालिकेत विलिनीकरण अत्यंत आवश्यक आहे. पुणे आणि खडकी कॅन्टोन्मेंट बोर्डाचा पुणे महापालिकेत समावेश केला आहे. त्याचप्रमाणे देहूरोड कॅन्टोन्मेंट बोर्डाचा पिंपरी-चिंचवड महापालिकेत समावेश करावा. त्यामुळे देहूरोड मधील नागरिकांना दर्जेदार सुविधा मिळतील. पाणी, कचरा, वीज, ऑनलाइन सेवा मिळतील. याचा नागरिकांना लाभ होईल. देहूरोड भौगोलिकदृष्ट्या पिंपरी-चिंचवडच्या जवळ आहे.

देहूरोड छावणी आर्थिक संकटांचा सामना करित आहे. केंद्र सरकारकडून अपेक्षित आर्थिक सहाय्य मिळत नाही. त्यामुळे नियोजित विकास होत नाही. नागरिकांना मुलभूत सुविधा मिळत नाहीत. देहूरोडमधील नागरिकांचीही महापालिकेत समावेश करण्याची मागणी आहे. त्यामुळे देहूरोड कॅन्टोन्मेंट बोर्डाचा पिंपरी-चिंचवड महापालिकेत समावेश करावा.

# चाकण औद्योगिक क्षेत्राच्या समस्यामुक्तीसाठी महायुती सरकार 'ऑन ॲक्शन मोड'

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

चाकण एकत्रित बैठक नियोजित केली आहे. चाकण औद्योगिक क्षेत्राचे या बैठकीकडे लक्ष लागले आहे.

चाकण औद्योगिक क्षेत्रातील वाहतूक कोंडी आणि पायाभूत सोयी-सुविधांबाबत निर्माण झालेल्या गंभीर समस्यांकडे राज्य सरकारचे लक्ष वेधण्यासाठी भाजपा आमदार महेश लांडगे यांनी पुढाकार घेतला. गेल्या आठवड्यात विविध औद्योगिक संघटनांचे प्रतिनिधींनी त्यांची भेट घेतली होती आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत सविस्तर चर्चा करुन "ॲक्शन प्लॅन" निश्चित करण्याबाबत मागणी केली होती. त्यानुसार, आमदार लांडगे यांनी मुख्यमंत्री कार्यालयाकडे पाठपुरावा सुरू केला होता.




दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार, आता राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री यांच्या उपस्थितीमध्ये संबंधित सर्व विभागांची बैठक नियोजित केली आहे. या बैठकीत निश्चितपणे धोरणात्मक निर्णय होतील, अशी अपेक्षा आहे. गत पावसाळी अधिवेशनामध्ये पुणे व पिंपरी-चिंचवडमधील विधानसभा सदस्यांनी आवाज उठवला होता. त्यामुळे चाकण आणि औद्योगिक क्षेत्राच्या प्रश्नांना वाचा फुटली आहे.



या बैठकीला अपर मुख्य सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, सचिव (रस्ते), सार्वजनिक बांधकाम विभाग, मुख्य अभियंता, एमएसआयडीसी, मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, पुणे, मुख्य अभियंता, एमआयडीसी, पुणे, प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, पुणे, पोलीस उपायुक्त (वाहतूक), पिंपरी-चिंचवड, मुख्य अधिकारी, चाकण / तळेगांव नगरपालिका असे प्रमुख अधिकारी आणि लोकप्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत.

> "UNCLOG_Chakan _MIDC" या मोहिमेला केवळ पाठिंबा नव्हे, तर सक्रीयपणे चाकण वाहतूक कोंडी आणि समस्यामुक्त करण्यासाठी आम्ही सर्वोतोपरी पाठपुरावा करणार आहोत. आगामी काळात राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या नेतृत्त्वातील भाजपा महायुतीचे सरकार हिंजवडी आयटी पार्क समस्यामुक्तीसाठी ज्या प्रमाणे काम करीत आहे. त्याप्रमाणे चाकण औद्योगिक क्षेत्रातील समस्या सोडवण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत.
>
> - महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 8999948968